


दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार 27 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 279 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4







Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# बेकायदेशीर वाळू उपसा प्रकरणी अंभोरा पोलिसांची कारवाई : 38 लाख 40 हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त

■ देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

अंभोरा पोलीस स्स्टेशनाचे बिट अधिकारी व अंमलदार मौजे ठोंबळ सांगवी शिवारात पेट्रोलिंग करीत असताना हातलोळण ते बोरुड येथील पांदन शिव रस्ता येथे दोन टिप्पर अवैधरित्या वाळू वाहतूक करत असल्याची आढळून आल्याने तत्काळ सापळा रचून धाड टाकली.या कारवाईदरम्यान दोन हायवा वाहनातून वाळूची वाहतूक करत असताना आढळून आले. वाहनचालक यांना वाळू वाहतूक परवानगीची कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात आले. मात्र त्याने कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत.

सदर बाबत खात्री करून 1) दगडू रामचंद्र वाघ 2) रामेश्वर भाऊसाहेब हिंगे यांनी स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे वाळू ची चोरटी वाहतूक करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले.त्यामुळे शासन तर्फे फिर्यादी पोशि/355 सतीश पैठणे यांनच तक्रारीवरून अंभोरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. 52/2026, कलम 303(2), 3(5) BNS अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत एकूण ₹38,40,000/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक देवकर यांचेकडे सुरू आहे.ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावंत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी श्री. बाळकृष्ण हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.सदर कारवाईत अंभोरा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री. मंगेश साळवे, पो.उ.नि. चंद्रकांत तावरे, पो.ना भगवान देवकर पो.अंमलदार . सतीश पैठणे, हनुमंत खांडेकर यांनी सहभाग घेतला.



# राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल

## तीन वर्षांत 'एक लाख कोटी डॉलर्स'चा टप्पा गाठण्याचा दावा; मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ मुंबई | वृत्तसंस्था

राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल स्थानावर असून पुढील तीन वर्षांत ती एक लाख कोटी डॉलर्सपर्यंत नेण्याचा संकल्प सरकारने केला आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी दिली. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी राज्यातील गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक वाढीचा आढावा मांडला.

महाराष्ट्रात ३१% गुंतवणूक मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेनंतर राज्यात मोठ्या प्रमाणावर सामंजस्य करार (MoU) झाले असून त्यांची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. देशातील एकूण गुंतवणुकीपैकी सुमारे ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली. २०२२–२६ दरम्यान झालेल्या करारांपैकी बहुतेक प्रकल्प प्रत्यक्षात येण्याच्या टप्प्यात आहेत.

औद्योगिक कॉरिडॉर, पायाभूत सुविधा आणि निर्यातवाढीमुळे राज्याच्या अर्थचक्राला गती मिळाल्याचा दावा त्यांनी केला. सव्वा लाख नोकऱ्यांचे लक्ष्य राज्यात ७५ हजार नोकरभरती जाहीर करण्यात आली होती. आतापर्यंत १ लाख २० हजारांहून अधिक युवकांना रोजगार देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हा आकडा लवकरच दीड लाखांच्या पुढे जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे पुढील काळात आणखी ९० हजार रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

### अर्थव्यवस्थेचा वेग वाढला

■ राज्याची अर्थव्यवस्था २०११–१२ मध्ये सुमारे २६ लाख कोटी रुपयांच्या घरात होती. गेल्या काही वर्षांत ती झपाट्याने वाढून ४५ लाख कोटींवर पोहोचल्याचा दावा सरकारने केला.

### पायाभूत सुविधा प्रकल्प कृषी व उद्योग क्षेत्रातील वाढ

- डिजिटल सेवा आणि स्टार्टअप धोरण
- यामुळे राज्याची अर्थव्यवस्था देशात आघाडीवर राहिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
- 'मुख्यमंत्री असताना मंत्र्यांना अधिकार नसतात!' – राजकीय आरोप-प्रत्यारोप
- दरम्यान, विधानसभेत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करताना, "मुख्यमंत्री असताना इतर मंत्र्यांना अधिकारच नसतात," असा टोला लगावला. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर देत, निर्णय प्रक्रियेत मंत्रिमंडळाचा सहभाग असतोच, असे स्पष्ट केले.
- 'सक्ती फक्त मराठीचीच' या मुद्द्यावरूनही सभागृहात चर्चा रंगली. काही विरोधी सदस्यांनी हिंदी सक्तीचा आरोप केला; मात्र सरकारने हे दावे फेटाळले.




# सिरसाळ्यात आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती

■ (सिरसाळा अतुल बडे)

सिरसाळा : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सिरसाळ्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज दिनांक २७ फेब्रुवारी मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे.

सिरसाळा व पंचक्रोशीतील शिवप्रेमी युवक मंडळी ह्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात येणार आहे . उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.सायंकाळी ५ वाजता भव्य गावभर मिरवणूक होणार आहे .

गेल्या एक महिन्यापासून आयोजक शिवप्रेमी युवक जयंती कार्यक्रमाची तयारी करत आहेत. पारंपारिक वाद्य, गावात मुख्य रस्त्या लगत भगवे ध्वज लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत. आज होणाऱ्या जयंती कार्यक्रमास सिरसाळा व परिसरातील नागरिक,युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित



रहावे असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज जयंती समिती च्या वतिने करण्यात आले आहे

# भव्य अश्वचाल स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न

## मयूर हॉर्स रायडिंग क्लबच्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून सुरु आहेत स्पर्धा





■ परळी प्रतिनिधी

महाशिवरात्रीनिमित्त वैद्यनाथ नगरीत भव्य अश्वचाल स्पर्धा; नांदेडच्या अश्वांनी पटकावली बाजी वैद्यनाथ नगरीत महाशिवरात्र यात्रेच्या निमित्ताने प्रख्यात अश्वप्रेमी डॉ. सुरेशचंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली मयूर हॉर्स रायडिंग क्लबच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य अश्वचाल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने आयोजित होणाऱ्या या स्पर्धेला यंदाही अश्वप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेतील विजेत्यांना नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

स्पर्धेत नांदेड येथील अश्वपालक मनिष कावळे यांच्या दोन अश्वांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले, तर परभणी येथील समद खान यांच्या अश्वाने तृतीय क्रमांक मिळविला. उत्कृष्ट शिस्त, वेग आणि देखणेपणामुळे स्पर्धा विशेष आकर्षण ठरली.

यावेळी परळी व परिसरातील अश्वप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद लुटला. पारंपरिक संस्कृती, अश्वसंवर्धन व क्रीडा संस्कार जोपासण्याच्या उद्देशाने डॉ. सुरेश चौधरी हे मयूर हॉर्स रायडिंग क्लबच्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून हा सातत्यपूर्ण उपक्रम राबवत असून या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# दाट आयब्रोने खुलवा सौंदर्य



चेह-यावर महत्त्वाचा भाग म्हणजे डोळ्यांवर असलेल्या आयब्रो... आपल्या आयब्रो सुंदर आणि आकर्षक असाव्यात असे प्रत्येक मुलीला वाटत असते. त्यासाठी मुली दर महिन्याला पार्लरमध्ये जात असतात. आयब्रो जाड आणि दाट असल्यावर तर अजूनस सुंदर दिसात. यासाठी मुली आयब्रो पेन्सिलचा वापर करतात. परंतु काही घरगुती उपाय करुन नैसर्गिकरित्या आयब्रो जाड आणि उठावदार करता येऊ शकता.

### कांद्याचा रस

कापसाच्या साहाय्याने कांद्याचा रस आयब्रोवर लावा. 15 मिनिटांनंतर थंड पाण्याने चेहरा धुवून घ्या. हा प्रयोग नियमित केल्यास तुम्हांला नक्कीच फायदा होऊ होईल.

### मेथीचे दाणे

मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजवून त्याची पेस्ट करा. सकाळी तयार पेस्ट आयब्रोवर लावा व 5 मिनिटांनी धुवा. यामुळे केस वाढत नसले तरीही त्याची गळती रोखण्यास आणि ब्रॉडनेस वाढवण्यास मदत होईल.

### बदामाचं तेल

या तेलाचा वापर नियमित केल्याने आयब्रो वाढण्यास आणि त्याचे पोषण होण्यास मदत होते. यातील व्हिटामिन ई केसांची वाढ सुधारतात. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी हा मसाज करायला विसरू नका.

### जास्वंद

जास्वंदाची पेस्ट केसांची वाढ सुधारण्यास मदत करते. यामुळे केसांची मूळं घट्ट होण्यास मदत होते.

### कोरफड

यामुळे आयब्रोची वाढ सुधारते तसेच त्वचा मुलायम होण्यास मदत होते. आयब्रोला त्यामुळे नियमित कोरफडीच्या गराने मसाज करावी.

### एरंडेल तेल

यातील ओमेगा 3 फॅटी ॲसिड रक्तप्रवाह सुधारण्यास मदत करतात. परिणामी केसांची वाढ सुधारते. याकरिता रोज रात्री आयब्रोला एरंडेल तेल लावून झोपा.

### खोबऱ्याचे तेल

विरळ आयब्रो असणाऱ्यांसाठी हा एक उत्तम उपाय आहे. कोमट तेल आयब्रोला लावा. यामुळे त्वचा मुलायम होण्यास मदत होते. तेलाऐवजी तुम्ही नारळाचे दूधही वापरू शकता.

# नैसर्गिक सौंदर्यासाठी काही टिप्स...

आपण सुंदर दिसण्यासाठी अनेक उपाय करतो. कधी कपड्यांचे तर कधी मेकअप करुन आणि विविध स्टाईलचा वापर करुन आपण सुंदर दिसण्यात यशस्वी होतो, परंतु ही सुंदरता मर्यादीत काळापर्यंतच राहते. आज आपण पाहणार आहोत अशा गोष्टी ज्या तुम्हाला आतुन सुंदर बनवतील...सुंदर दिसण्यासाठी तुम्ही कशाचाही वापर करा करा परंतु चेह-याची खरी चमक ही तुमच्या आत्मविश्वासाने वाढते. वैज्ञानिकांनीही गोष्ट मान्य केली आहे. जेव्हा तुम्ही कोणत्याही कार्यक्रमात किंवा सम्मेलानात सहभागी होता किंवा एखादा इंटरव्यू द्यायला जाता. प्रत्येक ठिकाणी तुमचा आत्मविश्वास असलेला चेहरा आकर्षित करतो. तुमचे हेच आकर्षण तुम्हाला सर्वात सुंदर बनवते. यामुळे तुमच्या आजुबाजूच्या लोकांना स्वतःमध्ये आत्मविश्वासाची कमी जाणवते. अनेक वेळा तुमचा आत्मविश्वास तुम्ही काही न करता तुम्हाला यशस्वी करतो.

### प्रसन्न मन

मनाचा आनंद नेहमी चेह-यावर दिसतो, आणि चेह-याची चमचक आपोआप वाढते. हसमुळ चेहरा प्रत्येकाच्या मनात जागा बनवतो आणि प्रत्येक व्यक्ती त्याकडे आपोआप आकर्षित होतो. एखाद्या कार्यक्रमात आपला खुश चेहरा प्रत्येकाच्या आकर्षणाचे क्रेंद ठरतो. प्रसन्न मनाचा फायदा तुमचा चेहरा आणि तुमचे मन या दोन्हींवर पडतो.





### मेडिटेशन

मेडिटेशन आपल्या मनाला एकाग्र करण्यासोबतच आपल्या मनाला शांत करते, ज्याचा प्रभाव तुमच्या चेह-यावर प्रत्यक्ष दिसु लागतो. मनाची शांती जेव्हा, सौम्यता आणि धैर्यासोबतच चेह-यावर उतरते तेव्हा तुमची आंतरीक सुंदरता खुप आकर्षक दिसते. मेडिटेशन तुमच्या हाव-भाव आणि स्वभावाला सुंदर बनवते. ही आंतरिक सुंदरता थोडा वेळासाठी नाही तर नेहमीसाठी तुमच्या सोबत राहते.

### योग-व्यायाम

योग, व्यायाम किंवा एक्सरसाईज काहीही असो, हे तुमच्या शरीर आणि आत्मा दोघांनाही सुंदर बनवते. तुमच्यामध्ये सकारात्मक ऊर्जेचे संचार करते. जे तुमच्या चेह-यावर सहज दिसते. योग मानसिक आणि शारिरीक दोन्ही प्रकारे प्रभावित करते, आणि व्यायामामुळे शरीरातील रक्तसंचार सुव्यस्थित होते ज्यामुळे चेह-यावरील ग्लो वाढतो. तुमच्यातील विकृतीही दुर होउन जाते.

### फळ आणि भाज्या

भोजनामध्ये तेल आणि मसालेदार पदार्थ खाण्याऐवजी सात्विक भोजन आणि भोजनात भरपूर फळे आणि हिरव्या भाज्या असायला हव्या, हे खुप फायदेशीर असते. यासोबतच यामध्ये पोषणतत्त्वांसोबतच पाण्याचे प्रमाण जास्त असते. प्रत्येक प्रकारचे फळ नियमानुसार सेवन केल्याने तुमच्या शरीरात व्हीटॅमिन आणि मिनरल्सची कमतरता दुर होते आणि शरीर स्वस्थ राहते. यामुळे चेह-यावर नैसर्गिक चमक येते.

### सकारात्मक दृष्टीकोण

तुम्ही तुमच्या जीवनात कितीही यशस्वी झाले, कीतीही चांगले असाल तरी जोपर्यंत तुम्ही सकारात्मक राहत नही तो पर्यंत ते यश काहीच कामाचे नाही. सकारात्मकतेचा तुमच्या व्यक्तिमत्त्वावर येवढाच प्रभाव पडतो जेवढा पोषक तत्त्वांचा तुमच्या शरिरावर. सकारात्मकता तुम्हाला आतुण सुंदर बनवते. तुम्हाला तुमच्यामध्ये एका सुंदरतेची जाणीव होईल, जी तुम्हाला तुमच्या चेह-यावर दिसेल.

# डोळ्यांची काळजी घेण्यासाठी...




डोळ्यांची सूज कमी करणे तसेच त्यांची सुंदरता वाढविण्याकरिता तुमच्या स्वयंपाक घरात हमखास मिळणाऱ्या काही गोष्टी उपयोगी येऊ शकतात. त्यातलीच एक आहे काकडी. काकडी ही थंडी असते आणि त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते. जर डोळे थकल्या सारख वाटते असतील तर काकडीचे कप करून ते डोळ्यावर ठेवा त्यने डोळ्यातील उष्णता कमी होऊन डोळे शांत होतील आणि थकवा जाईल.

वापरलेल्या टी-बॅग्स देखील तुम्ही वापरू शकता त्याकरिता टी-बॅग्स फ्रीजर मध्ये ठेवा आणि मग त्यांना डोळ्यांवर ठेवा, त्याने डोळ्यांची सूज कमी होईल आणि ते फ्रेश दिसतील.डोळ्यांतला तेज परत आणण्याकरिता सुकलेल्या आवळ्याच्या फोडींना रात्रभर एक वाटी पाण्यात भिजू घाला, त्याचा ज्यूस काढा आणि त्यात परत एक वाटी पाणी घाला. त्याने रोज सकाळी डोळे धुवा. अगदी काही दिवसातच तुम्हाला तुमचे डोळ्यांतील निस्तेजपणा कमी झाल्याचे आढळेल.तसेच लॅव्हेंडर ऑईल देखील डोळ्यांची सुंदरता वाढविण्याचे काम करते. एक वाटी पाण्यात एक थेंब लॅव्हेंडर ऑईल घाला आणि त्यात दोन कापसाचे बोळे टाका नंतर त्या कापसांच्या बोळ्यांना डोळ्यांवर ठेवा. यामुळे डोळे अतिशय तजेलदार आणि टवटवीत दिसतात.


# केसाना हवे कंडिशनर

प्र त ये का ला मुलायम आणि चमकदार केस हवे असतात. यासाठी कं डि श न र ही वापरले जाते. परंतु हवे तसे परिणाम मिळत नसतील तर समजा तुम्ही चुकीच्या पद्धतीने याचा वापर करत आहे. चांगल्या परिणामासाठी असा करा कंडिशनरचा वापर...

- केसाचे सेटिंग करण्यापूर्वी कंडिशनिंग करून घ्यावे. यामुळे ते अधिक चांगले सेट करता येतात. कंडिशनर केसाना लावावे ते टाळूला लाऊ नये.
- कंडिशनिंग करण्यापूर्वी केस स्वच्छ धुऊन घ्यावेत. जेणेकरुन शॉम्पू पूर्णपणे निघून जाईल.
- कंडिशनर वापरण्यापूर्वी केसामधील जास्तीचे पाणी काढावे. साधारणपणे पाच मिनिटांनी कंडिशनर पूर्णपणे धुवावे.
- केस खूपच खराब झालेले असल्यास कंडिशनरचे प्रमाण थोडे अधिक घ्यावे व थोडा अधिक वेळ लावून ठेवावे.
- घरच्याघरी कंडिशनर करायचा असल्यास अंडे, मेंदी, मेथी किंवा जास्वंदाच्या पानांचा वापर करता येईल.
- कंडिशनरच्या वापरामुळे केसावर एक संरक्षक आवरण निर्माण होते. याच्यासाठी कंडिशनिंग करण्यापूर्वी शॉम्पू वापरून केस स्वच्छ करून घ्यावेत आणि नंतरच कंडिशनिंग करावे.



# पांडुरंग वामन काणे



विख्यात कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे ( जन्मः ०७-मे-१८८० मृत्यू : १८-एप्रिरील-१९७२ ) हे विल्सन कॉलेज, मुंबई येथून एम. ए. झाले. त्यांना मराठी, हिंदी खेरीज संस्कृत, जर्मन, फ्रेंच इ. भाषा अवगत होत्या.कोकणातील वेदशास्त्रपारंगत अशा मध्यमवर्गीय कुटुंबात काणे यांचा जन्म झाला. अतिशय मेहनतीने स्कॉलरशिप मिळवत आणि एकीकडे शिकवत राहून त्यांनी खूप विद्या संपादन केली. संस्कृत भाषेवर अतिशय प्रेम, त्यामुळे बी.ए.ला संस्कृतमध्ये सर्वप्रथम, मग एलएल.बी., झाला वेदान्त पारितोषिकासह एम.ए. आणि 'हिंदू-मुसलमान कायदा' घेऊन एलएल.एम. हे त्यांचे शिक्षण.१९०४ साली रत्नागिरी जिल्ह्यातील शाळेत शिक्षक म्हणून कामास काणेंनी सुरूवात केली. नंतर ते एल्फिंस्टन हायस्कूल, मुंबई येथे नोकरीवर होते. पुढे ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले.प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास, सामाजिक अभिसरणाचे भान या दोन अगदी वेगळ्या वाटणाऱ्या गोष्टींमधून काण्यांनी 'धर्मशास्त्राचा पंचखंडात्मक इतिहास' नावाचा ग्रंथ सिद्ध केला. त्यांचे प्राचीन भाषा, वाङ्मय, काव्य महाकाव्य, अलंकारशास्त्र यांचे प्रेम आणि कायदेविषयक जाण, तार्किक मांडणी, प्रथा आणि परंपरांचा कालानुरूप अर्थ लावण्याची क्षमता या आणि अशा शेकडो पैलूंचे एक विस्मयकारी मिश्रण पांडुरंगशास्त्रींच्या लेखनात झाले.

मग केमिकल टेक्नॉलॉजी आणि केमिकल इंजिनिअरिंगकडे वळले. त्यांना लंडनच्या इंपीरियल कॉलेजमधून इंधन वायूंच्या ज्वलनाच्या अभ्यासासाठी पीएच.डी मिळाली आहे.. डॉ.गोविंद पांडुरंग काणे हे मुंबई विद्यापीठात प्रपाठक, प्राध्यापक होते आणि नंतर माटुंग्याच्या यू.डी.सी.टी.मधे डायरेक्टर झाले. त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. गोविंद पांडुरंग काणे हे दिल्लीच्या उद्योग मंत्रालयाचे वैज्ञानिक सल्लागार होते. त्यांना पद्मश्री देण्यात आली होती.नातू डॉ. शांताराम यांना मुंबईच्या आयआयटीकडून डॉक्टरेट मिळाली आहे.

# कथा
## राक्षस, चोर आणि ब्राह्मण

ए का
िवात एक द्रोण नावाचा ब्राह्मण राहत होता. तो अतिशय गरीब होता. पूजापाठ करून जे द्रव्य मिळेत, त्यावरच तो आपला उदरनिर्वाह करीत असे. एके दिवशी एका यजमानने त्या गरीब ब्राह्मणाला दोन चांगल्या दुभत्या गायी दान दिल्या. दानात मिळालेल्या त्या दोनी गायी त्यानं घरी आणल्या अन् त्या दिवसापासून त्या ब्राह्मणाचं दैन्य पळालं. एके काळी शिळी पोळी भाजी खाणार तो ब्राह्मण! गावात दूध, दही, लोणी, तूप विकून घरातही दूध भाकरी खाऊ लागला. द्रोण ब्राह्मणाच्या त्या दोनही सुंदर गायींवर एका चोराची नजर होती. सुयोग्य संधी बघायची अन् ब्राह्मणाच्या या दोन्ही गायी पळवायच्या, असा त्या चोराचा डाव होता. एका अवसेच्या अंधारात तो चोर त्या गायी चोरून नेण्यासाठी येत असताना वाटेतच त्या चोरीचा गाठ एका राक्षसाबरोबर पडली. परस्परांनी एकमेकांना 'तू कुठे अन् का जातोस,' ते विचारलं. चोर म्हणाला, 'मी द्रोण ब्राह्मणाच्या गायी चोरायला चाललो आहे. पण तू कुठे चालला आहेस?' अरे, मी तर प्रत्यक्ष त्या ब्राह्मणालाच मारायला, त्याचे भक्षण करायला चाललो आहे. ह्या ब्राह्मणानं मंत्र-तंत्र करून माला दूर घालवायचं, माझं अन्न-पाणी तोडलंय, पण आज मी त्यालाच खाणार आहे. झालं! दोघांचही लक्ष एक निघालं. दोघांनी मैत्रीचा हात पुढे केला. तो चोर अन् राक्षस हे दोघं त्या ब्राह्मणाच्या दारांत आले. दोघांनीही घरात डोकावून पाहिले, तर तो ब्राह्मण बिचारा शांत झोपला होता. राक्षस ब्राह्मणाला खायला जाणार, तोच चोर म्हणाला, अरे थांब! मी आधी दोन्ही गायी घेऊन जातो, मग तू त्याला खा. त्यावर राक्षस म्हणाला, वा रे वा! मोठा शहाणाच आहेस की तू! तू गायींना नेताना त्या हंबरल्या, तर तो जागा होणार नाही का ! मग मी काय करू? राक्षसाचं हे म्हणणं चोराला पटेना अन् चोर आपली घाई सोडेना. असं करता-करता हळूहळू त्यांचे एकमेकांचे आवाज तापू लागले. परस्परांतला संवाद संपू लागला. अन् वाद-विवाद भांडणं चालू झाली. त्यात त्या दोघांनी आपल्या मोठ्या आवाजचं भात राहिलं नाही. ते आवाज ऐकून गायी हंबरल्या. मोत्यानं भुंकायला सुरूवात केली. ब्राह्मणही झोपेतून जागा झाला. त्याने राक्षस अन् चोराला पकडून आरडा-ओरडा केला. त्या आवाजानं शेजारी मंडळी काठ्या, मशाली इ. घेऊन धावत आले. त्यांना पाहून राक्षस आगलील आणि चोर लोकांना पाहून धूम पळून गेला.

तात्पर्य : फुकट शब्दानं शब्द वाढवून वादविवाद करू नये. भांडणाने फायदा तर होणे दूरच, पण अनेकदा नुकसानच होते.

# कविता
## कोंबडीला आला टेलिफोन



कोंबडीला आला टेलिफोन
तिनं विचारलं,
''बोलतंय कोण ?''
बोलत होता रावस मासा
तो म्हणाला, ''सावध असा.
शेजारीच आहे मेजवानी
हिडू-बिडू नकाच कोणी.''
कोंबडीनं फोन ठेवून दिला.
तिचा जीव घाबरुन गेला.
तेवढ्यात आली बकरीबाई
तिला काहीच ठाऊक नाही
कोंबडी गेली तिच्यापाशी
हळूच लागली कानाशी.
बकरी म्हणाली, ''ऐका तरी
मेजवानी एक आहे खरी
पण पाहुणे आहेत शाकाहारी
मी बातमी काढलीय सारी.

# पक्ष्यांची ओळख
## कृष्ण थिरथिरा





कृष्ण थिरथिरा साधारणपणे १५ सें. मी. आकाराचा पक्षी असून नराचे डोके, पाठ, पंख व छातीचा भाग काळा, पोटाचा भाग नारिंगी, सतत हलणारी शेपटी नारिंगी-तपकिरी रंगाची असते तर मादी फिकट तपकिरी रंगाची असते. कृष्ण थिरथिरा हा शेपटी नाचवत किडे शोधत फिरत राहणारा पक्षी आहे. उन्हाळ्यात उत्तर भारतात हिमालयाच्या गढवाल भागापासून नेपाळ पर्यंत राहणारा हा पक्षी हिवाळ्यात उर्वरीत भारतभर तसेच बांगलादेश मध्ये आढळतो. कृष्ण थिरथिराचे काही जातभाई युरोप मध्येही आढळतात. ते वरील कृष्ण थिरथिरा पेक्षा रंगाने वेगळे आहेत. पण आकार आणि सवयी साधारणपणे सारख्याच आहेत. कृष्ण थिरथिरा दगडी माळराने, बागा, जंगलाच्या बाहेरील हद्दीत राहणारा पक्षी आहे.मे ते ऑगस्ट हा याचा वीणीचा हंगाम असून मादी एकावेळी निळसर-हिरवट रंगाची ४ ते ६ अंडी देते. याचे घरटे गवत, केस, कापूस, पिसे इ. वस्तुंपासून बनलेले असते. सहसा घरटे एखाद्या मोठ्या खडकाखाली किंवा जमिनीत असते. युरोपियन कृष्ण थिरथिराचे घरटे जुनाट घरांच्या भिंतींमध्येही आढळले आहेत.

# छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थांची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वतःचे स्वतः बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



## टोमॅटो जिंजर सूप


### साहित्य


६ मोठे टॉमेटो १ टिस्पून आले, किसलेले १/४ टिस्पून लाल तिखट १/२ टिस्पून सोया सॉस
१ टेस्पून पाइनॅपल क्रश
चवीपुरते मिठ चवीपुरती साखर १/२ चमचा लिंबू रस

### कृती

टॉमेटो उकडून घ्यावे. उकडलेले टॉमेटो, साधारण दीड कप पाणी, आले, लाल तिखट, अननस, मिठ, साखर आणि लिंबू रस एकत्र मिक्सरमध्ये बारीक वाटावे. गाळण्यातून गाळून घ्यावे. पातेल्यात घालून एक उकळी काढावी. चव पाहून गरजेचे जिन्नस घालावे. सोया सॉस घालून सूप सर्व्ह करावे.

# दिलेल्या चित्रात रंग भरा





दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# मराठी भाषा : संस्कृती आणि अस्मितेचा श्वास : डॉ. राजेंद्र बगाटे




२७ फेब्रुवारी हा दिवस मराठी समाजाच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेत केवळ औपचारिक उत्सव म्हणून नोंदला गेलेला नाही, तर तो आपल्या भाषिक आत्मभानाचा, स्मृतिधनाचा आणि अस्मितेच्या सातत्याचा साक्षीदार आहे. मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना आपण एका अर्थाने स्वतःकडे म्हणजेच आपल्या बोलण्यात, विचारात, संवेदनांत आणि सामाजिक वर्तनात खोलवर रुजलेल्या भाषेकडे पाहतो. भाषा ही फक्त संवादाचे साधन नसते; ती समाजाची सामूहिक स्मृती असते. पिढ्यान्‌पिढ्यांचे अनुभव, श्रम, आनंद, दुःख, संघर्ष, स्वप्ने आणि मूल्ये शब्दांच्या रूपाने भाषेत साठलेली असतात. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या भूमीशी, लोकजीवनाशी आणि इतिहासाशी घट्ट बांधलेली आहे. म्हणूनच तिचा गौरव म्हणजे आपल्या अस्तित्वाचा गौरव आहे.

मराठी भाषेचा इतिहास हा हजारो वर्षांचा, अनेक टप्प्यांतून गेलेला प्रवास आहे. प्राचीन महाराष्ट्री प्राकृतपासून सुरू झालेली ही भाषा अपभ्रंशाच्या अवस्थेतून पुढे जात लोकभाषा म्हणून विकसित झाली. प्रारंभी मराठी भाषा ही सामान्य जनतेच्या दैनंदिन व्यवहाराची भाषा होती. शेतकरी, कष्टकरी, कारागीर, व्यापारी, स्त्रिया सगळ्यांच्या जीवनात ही भाषा सहजपणे मिसळलेली होती. तिच्या शब्दसंपत्तीतून लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटते. म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, ओव्या, पोवाडे यांमधून मराठी भाषेने लोकसंस्कृती जपली आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली.

संत परंपरेने मराठी भाषेला एक नवे वळण दिले. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'च्या माध्यमातून संस्कृतमधील गहन तत्त्वज्ञान मराठी भाषेतून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले. हा क्षण मराठी भाषेच्या इतिहासातील क्रांतिकारक टप्पा मानला जातो. ज्ञानेश्वरांनंतर नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास यांसारख्या संतांनी मराठी भाषेला अध्यात्मिक उंची दिली. त्यांच्या अभंगांमधून मराठी भाषा ही भक्तीची, समतेची आणि करुणेची भाषा बनली. जातीभेद, अहंकार आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध संतसाहित्याने मराठी भाषेतून मानवी मूल्यांचा संदेश दिला. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ धार्मिक अभिव्यक्तीची भाषा न राहता, ती समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनली. मध्ययुगीन काळात मराठी भाषेने राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातही आपले स्थान निर्माण केले. स्वराज्यनिर्मितीच्या काळात मराठी भाषेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. राज्यकारभार, दप्तरी व्यवहार आणि न्यायनिवाड्यात मराठी भाषेचा वापर करून भाषिक स्वाभिमान अधोरेखित करण्यात आला. त्या काळात मराठी भाषा ही केवळ साहित्यिक किंवा धार्मिक मर्यादेत न राहता, ती सत्तेची, नीतीनिर्मितीची आणि लोककल्याणाची भाषा बनली. भाषा आणि सत्ता यांचे नाते लोकाभिमुख झाले; मराठी भाषा जनतेशी थेट संवाद साधणारी ठरली.

ब्रिटिश राजवटीच्या काळात मराठी भाषेने नवजागरणाचा अनुभव घेतला. मुद्रणयंत्राच्या आगमनामुळे वृत्तपत्रे, मासिके आणि पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होऊ लागली. समाजसुधारकांनी मराठी भाषेतून लोकांशी संवाद साधला आहे. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या विषयांवर मराठी भाषेतून निर्भीड लेखन झाले आहे. मराठी भाषा ही परिवर्तनाची भाषा बनली. समाजमन ढवळून काढणारी, प्रश्न विचारणारी आणि नव्या मूल्यांची जाणीव करून देणारी भूमिका तिने बजावली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही मराठी भाषेने जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्याने अनेक नवे प्रवाह अनुभवले. ग्रामीण साहित्याने खेड्यातील जीवन, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण संस्कृतीचे वास्तव मांडले. दलित साहित्याने सामाजिक विषमतेचे कटू वास्तव उघड केले आणि वंचितांच्या आवाजाला शब्द दिले. स्त्रीवादी लेखनाने स्त्रियांच्या अनुभवांना, वेदनांना आणि संघर्षांना अभिव्यक्ती दिली. आदिवासी साहित्याने मुख्य प्रवाहाबाहेरील समाजजीवन मराठी भाषेतून मांडले. या सर्व प्रवाहांमुळे मराठी भाषा अधिक व्यापक, समावेशक आणि लोकाभिमुख बनली आहे. आज मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना वर्तमानकाळातील आव्हानेही समजून घेणे आवश्यक आहे. जागतिकीकरण, शहरीकरण आणि इंग्रजी भाषेचे वाढते प्राबल्य यामुळे मातृभाषेच्या वापरावर मर्यादा येत आहेत. अनेक कुटुंबांत मुलांशी मराठीत संवाद कमी होत आहे. सार्वजनिक फलक, जाहिराती आणि कार्यालयीन व्यवहारांमध्ये मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जात असल्याची उदाहरणे दिसतात. ही परिस्थिती मराठी भाषेच्या भविष्यासाठी चिंताजनक आहे, हे नाकारता येणार नाही. तथापि, या आव्हानांबरोबरच काही आशादायक बदलही दिसून येतात. डिजिटल युगात मराठी भाषेला नवे व्यासपीठ मिळाले आहे. सोशल मीडिया, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स आणि व्हिडिओ माध्यमांद्वारे मराठी भाषेतून मोठ्या प्रमाणावर आशयनिर्मिती होत आहे. तरुण पिढी मराठी भाषेतून कविता, कथा, सामाजिक भाष्य, इतिहास, विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक लेखन करताना दिसत आहे. ही बाब मराठी भाषेच्या सर्जनशील क्षमतेचे द्योतक आहे.

मराठी भाषेचा प्रवास केवळ ऐतिहासिक कालखंडांपुरता मर्यादित नसून तो सातत्याने बदलणाऱ्या समाजजीवनाशी जोडलेला आहे. मध्ययुगीन भक्तीपरंपरेनंतर मराठीने जेव्हा पेशवाई, इंग्रजी राजवट आणि नंतर स्वातंत्र्योत्तर काळ अनुभवला, तेव्हा तिच्या आशयात, अभिव्यक्तीत आणि शैलीत आमूलाग्र परिवर्तन घडत गेले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांच्या आध्यात्मिक भाषेपासून ते महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचारांपर्यंत मराठीने समाजमन घडवण्याचे कार्य केले. ही भाषा केवळ भावनांची वाहक राहिली नाही, तर ती शोषणाविरुद्ध लढ्याचे, विवेकाचे आणि माणूसपणाच्या मूल्यांचे प्रभावी साधन ठरली.

ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव वाढत असताना मराठी भाषेसमोर अस्तित्वाचे आव्हान उभे राहिले. परंतु या काळातच मराठीने नवे बळ मिळवले. वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथनिर्मिती आणि आधुनिक शिक्षणसंस्था यांच्या माध्यमातून मराठी विचारविश्व अधिक व्यापक झाले. केसरी, मराठा, ज्ञानप्रकाश, मूकनायक, समता यांसारख्या पत्रांनी केवळ राजकीय जाणीव निर्माण केली नाही, तर भाषेला आधुनिक गद्यशैली बहाल केली. लोकमान्य टिळकांचे लेखन, आगरकरांचे विवेचन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि न्यायमूर्ती



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, मराठी आणि समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल
bagate.rajendra5@gmail.com

रानडे यांचे समाजचिंतन या सर्वांनी मराठी गद्याला तार्किकता आणि बौद्धिक खोली दिली.

स्वातंत्र्यलढ्यात मराठी भाषेने जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य केले. सभा, भाषणे, घोषणा आणि लेखन यांच्या माध्यमातून सामान्य माणसाला राष्ट्रीय चळवळीशी जोडण्याचे कार्य मराठीने समर्थपणे पार पाडले. या काळात कविता, पोवाडे, कीर्तन आणि लोककला यांचा वापर करून स्वातंत्र्याचा संदेश गावोगावी पोहोचवला गेला. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संघर्षाची शक्ती कशी ठरू शकते, याचे हे जिवंत उदाहरण होते.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात मराठी भाषेच्या विकासास नवे परिमाण लाभले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाषेची अस्मिता केंद्रस्थानी होती. अण्णा भाऊ साठे यांचे यामध्ये महत्वपूर्ण योगदान आहे. मराठी माणसाच्या हक्कांचा, स्वाभिमानाचा आणि सांस्कृतिक अस्तित्वाचा प्रश्न या चळवळीतून उभा राहिला. याच कालखंडात साहित्य, नाटक, सिनेमा आणि पत्रकारिता या क्षेत्रांत मराठीने अभूतपूर्व प्रगती केली. ग्रामीण आणि शहरी अनुभवांचे मिश्रण मराठी साहित्यात दिसू लागले. दलित साहित्य, स्त्रीवादी लेखन, आदिवासी अनुभवकथनया सर्व प्रवाहांनी मराठीला सामाजिक वास्तवाचे व्यापक दर्शन घडवले.

मराठी कवितेने या काळात विशेष उंची गाठली. कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर यांसारख्या कवींनी मराठी कवितेला आधुनिक संवेदनशीलता दिली. विशेषतः विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि भाषिक अभिमान यांचे जे दर्शन घडवले, ते मराठी साहित्याच्या इतिहासात मैलाचा दगड ठरले. त्यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा होतो, ही गोष्टच मराठी भाषेच्या सांस्कृतिक प्रतिष्ठेचे प्रतीक आहे.

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीनेही भाषेच्या लोकप्रियतेत मोठी भर घातली. नाटकांनी समाजातील विसंगती, नैतिक प्रश्न आणि मानवी नातेसंबंध प्रभावीपणे मांडले. संगीत नाटकांपासून प्रायोगिक रंगभूमीपर्यंत मराठीने सातत्याने नवे प्रयोग स्वीकारले. चित्रपटांमधून ग्रामीण जीवन, शहरी संघर्ष, स्त्रीचे प्रश्न, शेतकऱ्यांचे दुःख या विषयांना व्यापक प्रेक्षकांपर्यंत नेण्याचे काम मराठीने केले. आजच्या डिजिटल युगात मराठी भाषेसमोर नवी आव्हाने आणि नव्या संधी उभ्या आहेत. इंग्रजीचे वर्चस्व, तंत्रज्ञानातील भाषिक मर्यादा आणि बाजारपेठेचा दबाव यामुळे मराठीचा वापर काही प्रमाणात कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. परंतु दुसरीकडे सोशल मीडिया, ब्लॉग्स, यूट्यूब, पॉडकास्ट्स आणि डिजिटल वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून मराठी नव्या पिढीपर्यंत वेगळ्या स्वरूपात पोहोचत आहे. तरुण लेखक, कवी आणि विचारवंत मराठीला समकालीन प्रश्नांशी जोडत आहेत. तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना भाषेची मौलिकता कशी जपायची, हा प्रश्न आज अधिक महत्त्वाचा ठरतो.


मराठी भाषा गौरव दिन हा केवळ उत्सव नसून तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण दैनंदिन व्यवहारात मराठीचा किती सन्मान करतो, शिक्षणात, प्रशासनात, न्यायव्यवस्थेत आणि तंत्रज्ञानात मराठीला किती स्थान देतो, याचा विचार करण्याची ही संधी आहे. भाषा टिकते ती केवळ कायद्याने नाही, तर लोकांच्या जगण्यातून. घराघरांत, शाळांत, कार्यालयांत आणि सार्वजनिक जीवनात मराठीचा सहज, सन्मानपूर्वक वापर झाला तरच तिचे भवितव्य उज्ज्वल राहील.

मराठी ही केवळ भूतकाळाची आठवण नाही; ती वर्तमानाची गरज आणि भविष्याची आशा आहे. तिच्यातील लोकशाही मूल्ये, समतेची भावना आणि मानवी करुणा आजच्या ताणतणावाच्या काळात अधिक आवश्यक आहेत. म्हणूनच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण केवळ अभिमान व्यक्त न करता मराठी भाषेचे संवर्धन, समृद्धी आणि सर्जनशील विस्तार करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. मराठी भाषा जिवंत राहील ती आपल्या विचारांत, कृतीत आणि पुढच्या पिढीला दिलेल्या संस्कारांतून.

# मुक्ताईनगर रेशन दुकानदारांचा मनमानी कारभार; धान्य मिळते पण पावती गायब, नागरिकांमध्ये संताप

■ **मुक्ताईनगर (प्रतिनिधी)**

मुक्ताईनगर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांकडून शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. अनेक रेशन दुकानांमध्ये लाभार्थ्यांना धान्य तर दिले जाते, मात्र त्याची अधिकृत ई-पॉस (e-POS) पावती देण्यास दुकानदार टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. या प्रकारामुळे रेशन वितरणात पारदर्शकता उरली आहे की नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.



## नेमका प्रकार काय?

शासनाच्या नियमानुसार, रेशन कार्डधारकाला धान्य दिल्यानंतर म शी नमधून निघणारी पावती देणे बंधनकारक आहे. या पावतीवर धान्याचे प्रमाण आणि त्याचे विहित दर नमूद असतात. मात्र, मुक्ताईनगर तालुक्यातील अ ने क गावांमध्ये: दुकानदार "सर्व्हर डा ऊ न आहे" किंवा "कागद संपला आहे" अशी कारणे देऊन पावती देत नाहीत. पावती न मिळाल्याने ग्राहकांना नेमके किती किलो धान्य मिळाले आणि त्याचे किती पैसे कापले गेले, याची खात्री करता येत नाही. काही ठिकाणी जादा दराने धान्य विक्री होत असल्याची शक्यताही नागरिकांनी वर्तवली आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष?

■ **रेशन दुकानदारांच्या या मनमानी कारभारामुळे पुरवठा विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. तालुक्यातील वरिष्ठ पुरवठा निरीक्षकांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, अचानक भेटी (Surprise Inspection) देऊन चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.**

तालुक्यातील ग्रामीण भागातील अशिक्षित आणि गरजू नागरिकांची यामध्ये मोठी फसवणूक होत आहे. एका लाभार्थ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, "आम्ही जेव्हा पावती मागतो, तेव्हा दुकानदार रागाने बोलतात किंवा पुढच्या वेळी देतो असे सांगून वेळ मारून नेतात. पावती नसल्यामुळे आम्हाला नेमका आमचा कोटा किती आहे हेच समजत नाही."




## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा" व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त सामाजिक उपक्रम संपन्न

■ **मुंबई,(केतन भोज)**

आम्हाला गर्व हिंदुत्वाचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या महाराष्ट्रातील शिवसैनिक सदस्य असलेला व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून सामाजिकसेवा अंतर्गत हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त सामाजिक ३१ वा उपक्रम जिल्हा नाशिक,त्र्यंबकेश्वर येथील आधार तीर्थ या आश्रमात आचार संहिता मुळे २२ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आला. आधार तीर्थ या आश्रमातील मागणी नुसार अनाथ लहान मुलांना बसण्यासाठी ५ गार्डन बेंच,विविध प्रकारचे कडधान्य,लहान मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण साहित्य,भरपूर प्रमाणात शालेय वस्तू,लहान मुलांना कपडे,वेगवेगळ्या प्रकारचे बिस्कीट,फरसाण तसेच गृहउपयोगी वस्तू भरपूर प्रमाणात अनाथ आश्रमास देण्यात आले.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून आलेले ग्रुपचे ५० सदस्य उपस्थित होते.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता नाना गायकवाड (शिवसेना उपनेता नाशिक) सौ.स्वाती पाटील ताई (महिला जिल्हा संघटीका नाशिक) महेश बडवे(उपजिल्हा प्रमुख नाशिक)नितीन जाधव(विभाग प्रमुख नाशिक)

# 27 फेब्रुवारी चंद्रशेखर आझाद पुण्यतिथी महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे. चंद्रशेखर आझाद यांचा जन्म 23 जुलै 1906 ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. 13 एप्रिल 1919 रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. त्यानंतर चंद्रशेखर आझाद 1920 मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या 15 व्या वर्षी त्यांना अटकही झाली.अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला 12 फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले. तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतिकारक झाले.आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता 1922 साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले.त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली. क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली. चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते. भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत.अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते.दिनांक 27 फेब्रुवारी 1931 रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला.इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात गोळीबार झाला. अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले. आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले. अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले. भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला.त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी-समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता. आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण, रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना करावा लागतो आहे. आज 140 करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही.परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार-खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत ठेवली आहे.यामुळे हा पैसा 140 कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य व गरीब लोकांना भोगावा लागत आहे.त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्याचप्रमाणे देशात बदलते हवामान व वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत.यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!



■ **लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**





# गाढे पिंपळगाव येथे संत सावता माळी मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भक्तीभावात संपन्न

परळी वैजनाथ दि. २६ (प्रतिनिधी)

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे दि. २४ ते २६ फेब्रुवारी दरम्यान संत सावता माळी, श्री विठ्ठल-रुक्मिणी व महादेव यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे भव्य व दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण गावात भक्तीमय व उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

सोहळ्याची सुरुवात मंगळवार (दि.२४) रोजी वेदघोष व मंत्रोच्चारात झाली. सकाळी गणपती पूजन, पंचांग पूजन, कलश स्थापना व विविध धार्मिक विधींनी कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर होमहवन, नवग्रह पूजन, वास्तुशांती आदी विधी पार पडले. बुधवार (दि.२५) रोजी सकाळी ८ वाजता टाळ-मृदुंगाच्या गजरात, भगव्या पताका व फुलांनी सजविलेल्या रथातून मूर्ती व कलशाची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. गावातील प्रमुख मार्गावरून निघालेल्या या शोभायात्रेत महिला, वारकरी, युवक-युवती मोठ्या संख्येने



सहभागी झाले होते. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते. बुधवारी रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. गणेश महाराज कटारे (धनेगावकर) यांचे हरिकिर्तन रंगले. त्यांनी संत परंपरेचे महत्त्व, नामस्मरणाची शक्ती व समाजातील एकात्मतेचा संदेश आपल्या कीर्तनातून दिला. उपस्थित भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेत भक्तीभावाने सहभाग नोंदविला. गुरुवारी (दि.२६) सकाळी ११ ते १ या वेळेत आचार्य महामंडलेश्वर स्वामी मनीषानंद महाराज (मानवतकर) यांच्या हस्ते मुख्य मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व मंदिरावरील कलशारोहण विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडला. मंत्रोच्चार, वेदघोष आणि शंखनादाच्या साक्षीने हा विधी संपन्न झाला. दुपारी ११ ते २ या वेळेत आचार्य स्वामी राघव चैतन्य महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याचा भावपूर्ण समारोप झाला. त्यांच्या प्रवचनातून संत विचार, सदाचार व समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला.

या तीन दिवसांच्या कार्यक्रमात काकडा आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, भजन, कीर्तन आदी धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य सोहळ्यास गावकरी, महिला, वारकरी संप्रदायातील भाविक, युवक तसेच पंचक्रोशीतील श्रद्धाळू मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. संपूर्ण गाढे पिंपळगाव गावात भक्ती, श्रद्धा आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# कु. प्रणया रोडे हिचे NMMS परीक्षेत नेत्रदीपक यश; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेली कामगिरी

■ परळी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी दिनांक 28 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) राज्यस्तरीय ऑनलाईन परीक्षेत कन्हेरवाडी (ता. परळी वैजनाथ, जि. बीड) येथील सोमनाथ विद्यालयाची प्रज्ञावंत विद्यार्थीनी कु. प्रणया लहुदास रोडे हिने उल्लेखनीय यश संपादन करत परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



NMMS ही परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने सन 2007-08 पासून दरवर्षी घेतली जाते. आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना इयत्ता 12 वीपर्यंत शिक्षणासाठी दरवर्षी 12 हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींवर मात करत शिक्षणाची वाट अधिक आत्मविश्वासाने चालता येते. इयत्ता 8 वीतील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावर घेतल्या जाणाऱ्या या स्पर्धात्मक परीक्षेत कु. प्रणया हिने विशेष प्राविण्य मिळवत आपल्या शाळेचा व गावाचा गौरव वाढविला आहे. तिच्या यशाबद्दल सोमनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शेख सर यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार केला तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षकवृंदांनीही तिचे कौतुक करत इतर विद्यार्थ्यांनी तिच्या यशातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

प्रणया हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मित्रपरिवार, नातेवाईक आणि ग्रामस्थांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर कोणतीही अडचण पार करता येते, हे कु. प्रणया रोडे हिने सिद्ध करून दाखवले आहे. तिचे यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.



कु. सिध्दी संजय देशमुख



कु. सृष्टी गजानन चव



जनार्दन दत्ता येणकर



अजिंक्य संगम आडे



श्रृती शरद जाधव



कु. केतकी मनोज केदार

# जागतिक महिला दिनानिमित्त पनवेल महापालिकेतर्फे महिलांचा विशेष गौरव

■ पनवेल वृत्तसंस्था

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त ९ मार्च रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमात पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून गौरविण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, पनवेल महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास असलेल्या शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, क्रीडा, कला, उद्योग, प्रशासन, पर्यावरण, महिला सक्षमीकरण तसेच इतर कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांची माहिती मागविण्यात येत आहे. उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलांची माहिती महापालिकेने निर्धारित केलेल्या विहित नमुन्यात महिला व बालकल्याण विभागाकडे दि. 26 फेब्रुवारी 2026 पर्यंत सादर करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

प्राप्त अर्जांमधून निवड करण्याचा अंतिम अधिकार निवड समिती सदस्यांना राहणार आहे. सदर अर्जाचा नमुना व सविस्तर माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिली आहे.



# मातोश्री माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी एन एम एम एस परीक्षेत उत्तीर्ण

■ महागाव प्रतिनिधी

शासन व शालेय शिक्षण विभाग द्वारा आयोजित राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा दरवर्षी घेतली जाते त्यामध्ये वर्ग आठवा मधून विद्यार्थी शोधून त्यांच्या शिक्षणाची पूर्णपणे हमी शासनामार्फत घेतली जाते सदर परीक्षेत मातोश्री विद्यालय आपल्या यशाचा ठप्पा पाडण्यास सरस पुढे आहे त्यामध्ये सिद्धी देशमुख, श्रीतेज राठोड, प्रणव राठोड ,केतकी केदार, सृष्टी चौरे ,जनार्दन येनकर, अजिंक्य आडे, श्रुती जाधव या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले व प्रज्ञावंत म्हणून आपलं स्थान निश्चित केलं. उत्तीर्ण विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी शुभेच्छा देऊन पुढील कार्यास सदिच्छा व्यक्त केल्या व प्राचार्य व समस्त कर्मचारी वृंद व पालक वर्ग यांनी शुभेच्छा दिल्या व पुढील शैक्षणिक कार्यासाठी व वाटचालीस सदिच्छा व्यक्त केल्या.

# लोकशाहीतील दुटप्पीपणावर प्रश्नचिन्ह!

भारतीय संविधानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी मिळालेल्या स्वातंत्र्यानंतर आणि २६ जानेवारी १९५० पासून खऱ्या अर्थाने लोकशाहीचा स्वीकार केला. संविधानाने संघराज्य पद्धतीचा स्वीकार करून केंद्र आणि राज्य अशी सत्तेची विभागणी केली. ज्याप्रमाणे केंद्रात लोकसभेचे महत्त्व आहे, त्याचप्रमाणे राज्यांमध्ये विधानसभा हे सर्वोच्च सभागृह मानले जाते. या लोकशाही प्रक्रियेत 'विधानसभा अध्यक्ष' आणि 'विरोधी पक्षनेता' ही दोन पदे अत्यंत महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची मानली जातात.विधानसभा अध्यक्ष हे पद जरी सत्ताधारी पक्षाच्या आमदारांमधून निवडून दिले जात असले, तरी त्या खुर्चीवर बसल्यानंतर ती व्यक्ती विशिष्ट पक्षाची राहत नाही. अध्यक्ष हा संपूर्ण सभागृहाचा प्रमुख असतो आणि संविधानाला स्मरून निष्पक्षपातीपणे निर्णय घेणे त्यांच्यावर बंधनकारक असते.